सा‌प्रवि/रवका/न.क्र.८८७/
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा
मुंबई - ४०० ०१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्र.१९ दिनांक १८.२.२००५.

विषय : महाराष्ट्र माहिती अधिकार नियम - २००५.
वाचा : या कार्यालयाचे पत्र क्र.साप्रवि/रवका/मरावीविकंम/न.क्र.८८७/ २२१० दिनांक २०.९.२००५.

......

केंद्र शासनाच्या `माहितीचा अधिकार अधिनियम - २००५` मधील तरतुदींची अंमलबजावणी म.रा.वी.वितरण कंपनीच्या सर्व कार्यालयात व्हावी या दृष्टीने त्याबाबतच्या सूचना मुख्य कार्यालयाचे पत्र क्र.साप्रवि/रवका/मरावीविकंम/न.क्र.८८७/२२१० दि.२०.९.२००५ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ मधील सूचनांच्या अंमलबजावणीकरिता, आता महाराष्ट्र शासनाने साप्रविचा शासन निर्णय क्र.केमाअ-२००५/ प्र.क्र.३१५(भाग-२)/०५/५ दि.१.१२.२००५ अन्वये राज्य शासनाच्या ``महाराष्ट्र माहिती अधिकार नियम,२००५`` अंतर्गत राजपत्रित अधिसूचना दि.१८.११.२००५ जारी केली आहे.

३. ``महाराष्ट्र माहिती नियम,२००५`` मधील सूचनांची अंमलबजावणी करण्याकरिता सर्व संबंधित अधिका-यांना विनंती करण्यात येते की त्यांनी दि.१८ नोव्हेंबर २००५ च्या राजपत्रित अधिसूचनेची प्रत नजीकच्या शासकीय मुद्रणालयातून प्राप्त करुन घ्यावी आणि त्यात नमूद केलेल्या सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

( सु. य. पाटील )
मुख्य महाव्यवस्थापक (क)

प्रत :
वितरण कंपनीच्या उप विभागीय कार्यालयापर्यंत प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.

प्रत माहितीकरिता व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-
१) मुख्य माहिती व जनसंपर्क अधिकारी
२) आस्थापना अधिकारी (तांत्रिक-आस्थापना)

..., ENERGY AND ... DEPARTMENT
Serial No. 86258
Date 13/12/05

74

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीच्या नियमांबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्र.केंमाअ-२००५/प्र.क्र.३१५(भाग-२)/०५/५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १.१२.२००५

पहा :- शासन परिपत्रक क्र.केंमाअ-२००५/प्र.क्र.३१५/०५/५, दि.१४.१०.२००५

शासन परिपत्रक :-

माहिती अधिकारासंदर्भातील केंद्र शासनाचा "माहितीचा अधिकार अधिनियम, २००५" दि.१२.१०.२००५ पासून अंमलात आला आहे. या अधिनियमाच्या अंमलबजावणीकरिता जरूर ते नियम करण्याचे अधिकार कलम २७(२) अन्वये राज्य शासनांना देण्यात आलेले आहेत. त्यानुसार राज्य शासनाने "महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५" तयार केले असून सदरचे नियम दि.११.१०.२००५ च्या शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले आहेत. सदर शासन राजपत्राची प्रत उपरोक्त दि.१४.१०.२००५ च्या शासन परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना पाठविण्यात आली आहे. राज्य शासनाने तयार केलेल्या नियमाचे मराठी भाषांतर तयार करण्यात आले असून त्यासंदर्भातील अधिसूचना दि.१८.११.२००५ च्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर दि.१८.११.२००५ च्या राजपत्राची प्रत माहितीस्तव सोबत पाठविण्यात येत आहे.

२. तसेच या अधिनियमातील कलम १५(१) मधील तरतुदींनुसार स्थापन करण्यात आलेल्या राज्य माहिती आयोगावर डॉ.एस.व्ही. जोशी यांची "राज्य मुख्य माहिती आयुक्त" पदी नियुक्ती करण्यात आली असून त्याबाबतची इंग्रजी अधिसूचना दि.८.१०.२००५ च्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली असून त्याची प्रत उपरोक्त दि.१४.१०.२००५ च्या शासन परिपत्रकासोबत पाठविण्यात आली आहे. सदर अधिसूचनेचे मराठी भाषांतर तयार करण्यात आले असून त्यासंदर्भातील अधिसूचना दि.१८.११.२००५ च्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर दि.१८.११.२००५ च्या राजपत्राची प्रत माहितीस्तव सोबत पाठविण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अ. व. दिवाण )
उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) राज्यपालांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मुख्य सचिव,
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव,
*७) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
*८) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, अपील